# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक २१/०४/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक २१/०४/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम व पाणी पुरवठा व कर विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | बांधकाम विभाग |
| १ | राधाकिसन चाळ प्रभाग क्रमांक पाच मधील नालीचे बांधकाम करणे बाबत. |
| २ | मलकापूर नगर परिषद हद्दीतील प्र. क्र. ९ मध्ये करावयाच्या विकास कामांना मान्यता मिळणेबाबत |
| | पाणीपुरवठा विभाग |
| ३ | मलकापूर शहरात होणाऱ्या भविष्यातील पाणीटंचाई करिता उपाय योजना करणे बाबत. |
| ४ | १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत शहरात विकास कामे करण्याबाबत. |
| ५ | मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. ९ मध्ये विकास कामे करण्याबाबत. |
| ६ | मलकापूर शहरात महाराष्ट्र जलशक्ती अभियान २०२३ राबविणे बाबत. |

**विषय क्र.१ :- राधाकिसन चाळ प्रभाग क्रमांक पाच मधील नालीचे बांधकाम करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार श्री अरुण अग्रवाल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहराध्यक्ष मलकापूर यांचे दिनांक १७/१२/२०२२ चे पत्र प्राप्त झाले असून प्रभाग क्र. ५ राधाकिसन चाळ मधील डॉक्टर विजय डागा यांच्या घरापासून ते चंद्रप्रकाश रावत यांच्या घरापर्यंत मुख्य नालीचे काम करणे जरुरीचे असल्याचे नमूद केलेले आहे त्यामुळे सदर काम नगरोत्थान योजनेअंतर्गत किंवा इतर उपलब्ध योजना निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.१ :- मलकापूर नगर परिषद हद्दीतील प्र. क्र. ९ मध्ये करावयाच्या विकास कामांना मान्यता मिळणेबाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार मा. आमदार श्री राजेश पंडितराव एकडे मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र.२१-मविस/M/७४५/२०२३ दि. ०६/०४/२०२३ नुसार मलकापूर न. प. हद्दीतील प्र. क्र. ९ मध्ये विकास कामे करण्यासंदर्भात सुचित केले आहे. त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे.

१) सालीपुरा पुलापासून ते वजीराबाद रस्त्यापर्यंत रस्ता काँक्रिटीकरण व नाल्याचे बांधकाम करणे.

२) संतोष वाढे यांच्या घरापासून ते दिलीपसिंग यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नालीचे बांधकाम करणे.

३) करीम भाईजी यांच्या घरापासून ते शेख कलीम यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे.

४) मो. इलियास यांच्या घरापासून ते मेहमूद मिस्तरी यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे.

५) शेख मुख्तार भाई यांच्या घरापासून ते इस्माईल भाई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नालीचे बांधकाम करणे.

६) बेरी कब्रिस्तानला पूर्व / दक्षिणेस संरक्षण भिंत बांधकाम करणे.

ठरविण्यात येते की, वरील नमूद कामे करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च नगरपरिषद प्राप्त शासनाचा निधी, न.प. फंड अथवा इतर उपलब्ध निधीतून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- मलकापूर शहरात होणाऱ्या भविष्यातील पाणीटंचाई करिता उपाय योजना करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पा.पु. अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार हतनुर धरणाचे बॅंक वॉटर हे मलकापूर शहराचे पाणी स्त्रोत असून इतर ग्रामीण १५ गावांचा पाणीपुरवठा व वडोदा, हरसोडा, हिंगणे गवाड सारख्या इतर नवीन योजना सुद्धा कार्यान्वित झाल्या आहेत. उन्हाळ्याचे तीव्रता वाढल्यावर बाष्पीभवनामुळे सदर जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात घट होऊ शकते व त्यामुळे मलकापूर शहराच्या पाण्यापुरवठा यंत्रणाची धुपेश्वर येथील हेडवर्क जॅकवेल मध्ये इंटेक विहीर मधून येणारे पाणी बंद होईल त्याचप्रमाणे २५ मार्च २०२३ रोजी पर्यंत हतनुर चा पाणीसाठा २१२.४७५ मीटर इतका उपलब्ध असून धरणात पाणी पातळी कमी झाल्यास धरणाचे दरवाजे उघडून पाणी सोडले जाते त्यामुळे धुपेश्वर येथील जलसाठा कमी होऊन पंपिंग बंद पडू शकते. जून २०१६ व २०१९ मध्ये सदर परिस्थिती निर्माण झाली होती परंतु त्यानंतर पाणीटंचाई निर्माण झालेली नाही. सद्यस्थितीत बॅंक वॉटर जलसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून सन २०२३ पर्यंत टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाही तरी देखील अशी परिस्थिती निर्माण झाल्यास खालील प्रमाणे उपाय योजना नगरपरिषद ने नियोजित केल्या आहेत.

संभाव्य कमी मुदत उपायोजना -

१) उन्हाळ्यात नदीपात्र कोरडे झाल्यास पूर्वेकडील पुलाखाली जे.सी.बी. द्वारे किंवा खाजगी मजुराद्वारे चारी मारून इंटेक विहिरीची पातळी वाढविणे व पंपाद्वारे जॅकवेलमध्ये पाणी उपसा करणे.

२) धुपेश्वर पंप सक्शन पाईप लांबी वाढविणे.

३) धुपेश्वर जॅकवेल नळगंगा जॅकवेल तसेच सार्वजनिक विहिरीचा गाळ काढणे व इंटेक पाईपचा गाळ काढणे.

४) मोटारीद्वारे नदीपात्रातील पाणी डायरेक्ट जॅकवेलमध्ये टाकणे.

५) वाकोडी पाणीपुरवठा योजनेद्वारे त्यांचे विद्युत बिल भरून न.प. मलकापूर आरक्षित पाणी संबंधितांशी चर्चा करून उचलणे.

६) शहरातील पाणीपुरवठ्याचे उपलब्ध पाणीसाठ्या नुसार वेळ कमी करून नियोजन करणे.

७) नदीपात्रातील अवैधरित्या पाणी उपसा करणाऱ्यांवर पोलीस कारवाई करणे.

८) अवैध नळ धारकांचा पाणीपुरवठा विखंडित करणे.

९) तात्पुरत्या स्वरूपात पाणी अडवण्यासाठी बंधारा बांधणे अथवा स्लोप ने पाणी पातळी वाढविणे.

१०) वाकोडी पाणीपुरवठा पाईपलाईन दुरुस्ती करणे.

११) शहरातील हातपंप विंधन विहीर दुरुस्ती करणे सार्वजनिक विहीर खाजगी विहीर अधिग्रहित करणे.

१२) नळगंगा पंपिंग स्टेशन दुरुस्ती करणे.

१३) हद्दीबाहेरील पाणीपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात बंद करणे अथवा वेळ कमी करणे.

१४) भूजल सर्वेक्षण यांचे मार्फत सर्वेक्षण करून नवीन विंधन विहीर हातपंप बसविणे.

१५) पाण्याची वितरण व्यवस्था नसलेल्या ठिकाणी मागणीनुसार पाईपलाईन टाकणे.

वरील उपाय योजना तात्पुरत्या स्वरूपातल्या असून मलकापूर ते नळगंगा धरण कायमस्वरूपी गुरुत्ववाहिनी पाईपलाईन उपलब्ध झाल्यास भविष्यात नगरपालिकेला पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता शहरात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी वरील उपाययोजनांना राबवणाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी, पाणीटंचाई निधी, अथवा १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत शहरात विकास कामे करण्याबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेला अहवालानुसार मा. आमदार श्री राजेश पंडितराव इकडे यांचे प्राप्तपत्रानुसार १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत शहरात विकास कामे करण्यासंदर्भात सुचवले आहे त्यानुसार करावयाची कामे खालील प्रमाणे

१) नवी मज्जिद ते जावेद ठेकेदार यांचे घरापर्यंत ६ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकून त्यावर १० x ६ चा पी.व्ही.सी. व्हॉल बसविणे.

२) लड्डे खा यांचे घरापासून ते रफी टेलर ते हाफिज साहेब यांच्या घरापर्यंत ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकून ६ x ४ इंची पी.व्ही.सी. व्हॉल बसवणे.

3) समद यांचे घरापासून ते शरीफ ठेकेदार यांचे घरापर्यंत ६ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन टाकून त्यावर ६ इंची पी.व्ही.सी. व्हॉल बसविणे.

उपरोक्त कामे ही नगरपरिषद हद्दीतील असून या भागात पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणे आवश्यक असल्याकारणाने सदर कामाच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. ९ मध्ये विकास कामे करण्याबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून पा.पु. अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आमदार श्री राजेश पंडितराव एकडे मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र. २१-मविस/M/७४५/२०२३ दि. ०६/०४/२०२३ नुसार मलकापूर न.प तील पारपेठ भागातील प्र. क्र. ९ मध्ये मुशीरभाई यांचे घरापासून ते वसीम यांचे घरापर्यंत ६ इंची व ४ इंची पीव्हीसी पाईपलाईन टाकण्याच्या कामाबाबत सूचित केले असून यावर सदर भागातील व्हॉलमन यांचा अहवाल घेण्यात आलेला आहे. त्यानुसार मलकापूर शहरातील पाणीपुरवठा हा झोन पद्धतीने करण्यात येत असून सद्यस्थितीत ३ झोन मध्ये पाणीपुरवठा होत आहे. तसेच सदर भागातील नळ धारकांना योग्य त्या दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने या भागात नवीन पाईपलाईन टाकल्यास एक झोन कमी होऊन पाण्याची व वेळेची बचत होईल असे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे नळधारकांचे हित व सोयीच्या दृष्टीने सदर कामे करणे महत्वाची आहेत.

उपरोक्त कामे करण्याच्या कारवाईस व येणारा खर्च १४ वा / १५ वा वित्त आयोग निधी, वैशिष्ट्यपूर्ण निधी, आमदार/ खासदार निधी, नगरपरिषद प्राप्त शासनाचा निधी अथवा न.प. फंड निधीच्या उपलब्धते नुसार करण्यास अथवा इतर उपलब्ध निधी मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- मलकापूर शहरात महाराष्ट्र जलशक्ती अभियान २०२३ राबविणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पाणीपुरवठा अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे प्राप्त पत्रानुसार जलशक्ती अभियान २०२३ च्या कालबद्ध मोहीम दि. ३ मार्च २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत नमूद कालमर्यादेनुसार प्रक्षेत्रातील आराखडे व कामाच्या नियोजनाची कार्यवाही सत्वर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. सदर उपक्रम हा भारत सरकारच्या विविध मंत्रालयांचा आणि राज्य सरकारांचा एकत्रित उपक्रम असून तो राबविण्यासाठी राज्यात अपर मुख्य सचिव. मृद व जलसंधारण विभाग हे राज्य नोडल अधिकारी आहेत. सदर जनशक्ती अभियान हे प्रामुख्याने खालील पाच उपक्रमांवर आधारित आहे

१) जलसंधारण आणि पावसाचे पाणी साठवण

२) पारंपारिक आणि इतर जलस्त्रोत तसेच मुख्य जलसाठ्यांचे नूतनीकरण

३) जल संरचनेचा पुनर्वापर आणि पुनर्भरण

४) पाणी लोक क्षेत्र विकास करणे

५) सधन वनीकरण

उपरोक्त कामे मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे पत्रात नमूद असून सदर कामे न.प. हद्दीत करावयाची आहे. त्यानुसार सदर उपक्रम राबवण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न. प. निधी अथवा वैशिष्ट्यपूर्ण निधी अथवा १४ वा वित्त / १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**